Ested-1969

KOYANA EDUCATION SOCIETIY'S

NAAC :- 'A+' Grade

# BALASAHEB DESAI COLLEGE, PATAN

Arts, Commerce, Science (UG &PG), B.C.A. & Vocational

# बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण

ISO 9001:2015

Principal
Dr. S. D.Pawar
*M.A. Ph.D*

Patan - 415206, Dist. - Satara (Maharashtra)
Phone : (02372) 283047, E-mail-str bdcp@rediffmail.com
Website: www.bdcp.edu.in

Certified ISO
9001:2015certiified

जा.क्र ५६२/२०२३-२४ दिनांक — २१/०२/२०२४

प्रति,
प्रा. तुषार रमेश महाले
अर्थशास्त्र विभाग.

विषय — कोयना एज्युकेशन सोसायटी कडून लघू संशोधन प्रकल्पासाठी मान्यता मिळाल्या बाबत.....

महोदय,

वरील विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, कोयना एज्युकेशन सोसायटी कडून आपल्या **"पाटण तालुक्यातील एस. टी महामंडळाच्या महिला सन्मान योजनेचा आर्थिक दृष्टिकोनातून अभ्यास"** या विषयाच्या लघु संशोधन प्रकल्पासाठी संशोधन समितीच्या शिफारशीनुसार मान्यता मिळालेली आहे. यासाठी आपणास १०,०००/- रु. मंजूर करण्यात आलेले आहेत. तरी यातील सुरुवातीला आपणास ५,०००/- रू देण्यात येतील . व उर्वरीत रक्कम आपण आपला प्रकल्प संशोधन समितीला पूर्ण करून दिल्यानंतर दिली जाईल. याची नोंद घ्यावी.

आपला विश्वासू

प्राचार्य
बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण
ता. पाटण, जि. सातारा

Estb. : 1967

|| ज्ञान दीपेन भास्वतः ||

**KOYANA EDUCATION SOCIETY, PATAN**

Tehsil – Patan (415 206), District. Satara, Maharashtra

**कोयना एज्युकेशन सोसायटी, पाटण.**

ता. पाटण जि. सातारा पिन – ४१५ २०६

Regd. No. R.T.N.S.F. 71
Date 8-12-1967

Phone No. : (02372) 283279 E-Mail – str_kesp@rediffmail.com

जा.क्र. २५५/२०२४-२५ दिनांक - १३/०२/२०२४

To,
Principal,
Balasaheb Desai College Patan ,
Satara 415206

**Subject: - Sanction & Approval to college teachers for undertaking Minor Research Projects.**

Sir,

The Koyana Education Society on the recommendations of the Expert Committee has approved the Minor Research Project entitled "पाटण तालुक्यातील एसटी महामंडळाच्या महिला सन्मान योजनेचा आर्थिक दृष्टिकोनातून अभ्यास " in the subject **Economics** to be undertaken by **Mr. Tushar Ramesh Mahale Balasaheb Desai College, Patan, Satara 415206**. The Koyana Education Society Sanctioned Rs. 10,000/- (Rupees Ten Thousand Only) for a period of **one year**. (2024-25)

| **Non-Recurring** Grant for one years | Amount Approved to Project |
|---|---|
| Books & Journals | 2000 |
| Equipment's | |
| **Recurring Grant** | |
| Contingency | 3000 |
| Special Needs | |
| Travel/Field Work | 5000 |
| Chemicals/ Analysis | |
| Others | |
| Total | 10000 |

**Total amount for the Project: - 10,000/- (Rupees Ten Thousand Only)**

**Note: 1) Project should be complete before 28th February, 2025**

**2) According to the suggestion made by the committee, it should be modified and submitted to the expert committee within 10 days.**

5000/-

DIRECTOR
Koyana Education Society
Patan, Tal. Patan, Dist. Satara

DIRECTOR
Koyana Education Society
Patan, Tal. Patan, Dist. Satara

# कोयना एज्युकेशन सोसायटी, पाटण
# लघु संशोधन प्रकल्प योजना २०२३-२४
## प्रस्तावाचे स्वरूप
## भाग- अ

१. मुख्य विषय : **अर्थशास्त्र**

२. अभ्यास क्षेत्र : **स्थूल अर्थशास्त्र**

३. कालावधी : **०१ वर्ष**

४. संशोधकाचे नाव : **प्रा. तुषार रमेश महाले**

५. संस्थेचे नाव : **बाळासाहेब देसाई कॉलेज ,पाटण**

- लिंग : **पुरुष**
- जन्म तारीख : **०८ नोव्हेंबर,१९९६**
- जात : **ST**
- पात्रता : **एम.ए., सेट (अर्थशास्त्र)**
- पदनाम : **सहाय्यक प्राध्यापक**
- पत्ता : **मु. पो. कळमुस्ते (हरसूल) ता. त्र्यंबकेश्वर जि. पिन कोड.४२२२०४**
- ई-मेल/ मोबाईल नं. :**tusharmahale86@gmail.com/ ८६२४९३३५४३**
- शिकवण्याचा अनुभव : **UG ०२ वर्ष, PG ०४ वर्ष**
- संशोधनाचा अनुभव :**०२ वर्ष**
- प्रकाशीत शोधनिबंध :**निरंक**
- प्रकाशीत पुस्तके : **निरंक**

<u>**भाग- ब**</u>

# प्रस्तावित संशोधन कार्य

## <u>प्रकल्पाचे शीर्षक:</u>

" पाटण तालुक्यातील एस. टी. महामंडळाच्या महिला सन्मान योजनेचा आर्थिक दृष्टीकोनातून अभ्यास"

## <u>परिचय:</u>

**महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ (MSRTC)**

एसटीची सेवा "गाव तेथे एसटी", "रस्ता तेथे एसटी" या ब्रीदवाक्यानुसार खेड्यापासून शहरापर्यंत विस्तारलेली आहे. महाराष्ट्रात एकूण ३१ विभागातून एसटीचे विभागीय कामकाज होते. त्याचप्रमाणे एसटी महामंडळाकडून आंतरराज्यीय सेवा पुरविली जाते. ह्या सेवेचा गुजरात, मध्य प्रदेश, कर्नाटक, आंध्र प्रदेश, तेलंगणा व गोवा इ. राज्यांत विस्तार झाला आहे. वाहनांद्वारे सावर्जनिक प्रवासी वाहतुकीची सुरुवात महाराष्ट्रात १९३२ च्या सुमारास खासगी व्यावसायिकांद्वारे सुरू झाली. त्यापुढच्या आठ दहा वर्षात या वाहतुकीचे नियमन करण्याची गरज भासू लागली. १९४७ मध्ये भारताच्या ब्रिटिशांची राजवट संपुष्टात आली. स्वतंत्र भारताच्या **मुंबई प्रांतात १९४८ मध्ये बॉंबे स्टेट रोड ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशन (बीएसआरटीसी)** या नावाने प्रवासी वाहतूक करण्यासाठी सरकारी कंपनी स्थापन करण्यात येऊन प्रवाशांच्या सार्वजनिक वाहतुकीचा (पब्लिक ट्रान्सपोर्ट) एकाधिकार या कंपनीला बहाल करण्यात आला.बीएसआरटीसीची **पहिली बस १ जून १९४८ यादिवशी पुणे ते अहमदनगर** या मार्गावर धावली. सदरची बस पुणे येथील पहिले चालक तुकाराम पांडुरंग पठारे व वाहक लक्ष्मण केवटे यांनी चालवली. पुढे महाराष्ट्र राज्याची स्थापना करण्यात आली. त्यानंतर महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एमएसआरटीसी) या नावाने महामंडळाचा कारभार सुरू झाला.

एसटीने कालानुरूप सेवेत बदल केला आहे. साध्या गाड्या, निमआराम बसगाड्यांसोबतच नव्या काळात आधुनिक सेवाही एसटीने सुरू केल्या आहेत. शिवनेरी, अश्वमेध, शिवशाही आणि शिवाई  या वातानुकूलित आरामसेवा एसटी चालवीत आहे. त्यानंतर स्वतःच्या संकेतस्थळावरून आगाऊ तिकीट विक्रीची सुविधा देऊन एसटीने एक पाऊल पुढे टाकले. मोबाईल ॲपही उपलब्ध करून देऊन त्याद्वारे आगाऊ आरक्षणाची सुविधा देण्यात आली आहे.बस प्रवासादरम्यान प्रवाश्यांच्या मनोरंजनासाठी अनेक मार्गांवर मोफत वायफाय सेवा दिली जाते.

**महिला सन्मान योजना**

महाराष्ट्र राज्यातील सर्वसामान्य लोकांना खेड्यापासून ते शहरापर्यंत जोडणारी एसटीची सेवा ही एक सामाजिक बांधिलकी निर्माण करणारी सेवा आहे. अनेक पाडे आणि खेड्यापासून शाळेत जाण्यासाठी विद्यार्थी वर्गासाठी हक्काचे वाहन म्हणजे आपली एसटी होय. आजारी व्यक्तींना खेड्यापासून तालुका आणि जिल्हा रुग्णालयात जाण्यासाठी हक्काचे आणि सुरक्षित प्रवासाचे वाहन म्हणजे आपली एसटी होय. महाराष्ट्र राज्याच्या २०२३-२४ च्या अर्थसंकल्पामध्ये महिलांसाठी महिला सन्मान योजनेची  घोषणा केली. १७ मार्च २०२३ पासून एसटी महामंडळाच्या सर्व प्रकारच्या बसेसमधून महिलांना तिकीट दरात ५० टक्के सवलत देण्याची योजना लागू करण्यात आली आहे. या योजनेला एसटी महामंडळाच्या स्तरावर महिला सन्मान योजना म्हणून ओळखले जात आहे. या योजनेची प्रतिपुर्ती रक्कम शासनाकडून महामंडळाला मिळणार आहे.

राज्य शासन एसटी महामंडळाच्या माध्यमातून समाजातील विविध घटकांना ३३ टक्के पासून १०० टक्के पर्यंत प्रवासी तिकीट दरात सवलत देते. यापूर्वी स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवा निमित्त राज्य शासनाने ७५ वर्षे पूर्ण झालेल्या ज्येष्ठांना एसटीच्या सर्व प्रकारच्या बसेस मधून" मोफत " प्रवासाची सवलत जाहीर केली होती.तसेच ६५ ते ७५ वर्षाच्या ज्येष्ठांना एसटीच्या सर्व प्रकारच्या बसेस मधून तिकीट दरात ५० टक्के सवलत देण्याची घोषणा केली होती. त्यानुसार या दोन्ही घटकांना एसटीच्या प्रवासी भाड्यात सवलत दिली जाते. सदर सवलतीची प्रतिपुर्ती रक्कम शासनाकडून महामंडळाला प्राप्त

होत आहे. महिला सन्मान योजनेचा एस.टी. महामंडळाच्या उत्पन्नात काय बदल झाला. या योजनेमुळे महिला, विद्यार्थी, वृद्ध या प्रवाशांवर काय परिणाम झाला. त्याचबरोबर महिला सन्मान योजनेमुळे खाजगी वाहतुकदारांवर झालेला परिणाम अभ्यासण्याची गरज असल्याने हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

## उदिष्ट्ये:

१. महिला सन्मान योजनेचा एस.टी. महामंडळातील आर्थिक बदलांचा अभ्यास करणे.

२. एस. टी. महामंडळाच्या महिला सन्मान योजनेचा खाजगी वाहतूकदारांवरील झालेल्या परिणामांचा मागोवा घेणे.

३. महिला सन्मान योजनेचा महिलांच्या प्रवासातील झालेल्या बदलाचा अभ्यास करणे.

## संशोधन पद्धती:

अ) संशोधन पद्धत सर्वेक्षण पद्धत:

सर्वेक्षण संशोधनाच्या पद्धतीत संशोधक परिस्थितीचे काळजीपूर्वक व काटेकोरपणे निरिक्षण करतो. सर्वेक्षण या शब्दामधुनच त्याची प्रचिती येते. तसेच कोणत्या गोष्टीचे सर्वेक्षण करावयाचे आहे हे नमूद केले जाते. सर्वेक्षणामुळे माहिती थोड्या वेळात कमी श्रमात व फार मोठ्या प्रमाणात संकलित करता येते.

ब) तथ्यसंकलनः

प्रस्तुत अभ्यासाचे कार्यक्षेत्र पाटण तालुका असून पाटण तालुक्यातील एस. टी. महामंडळाच्या महिला सन्मान योजनेचा आर्थिक दृष्टीकोनातून अभ्यास करण्यात येईल.

१) प्राथमिक स्रोत :-

प्राथमिक स्रोत हा संशोधनाचा पहिला संपर्क असतो. संशोधनाची उदिष्टांशी संबधीत तथ्य व माहिती संकलित करणे ही संशोधकाची प्राथमिक गरज आहे. यासाठी प्राथमिक तथ्य व माहिती संकलन केली जाईल. व्यक्तिगत माध्यमातून प्रश्नावली भरून घेतली जाईल. तसेच प्रत्यक्ष जाऊन

आगार प्रमुख, चालक, वाहक , खाजगी वाहतूकदार व प्रवाशी महिला यांच्या मुलाखती घेऊन माहिती संकलित करण्यात येईल. प्रश्नावली, मुलाखत सूचि, अनुसूची व निरिक्षण पध्दती या आधारे प्राप्त माहितीचे विश्लेषण करुन योग्य तो निष्कर्ष काढण्यात येईल.

२) दुय्यम स्त्रोत

एस. टी. महामंडळाचे वार्षिक अहवाल, वार्षिक अहवाल, वर्तमानपत्रे, पूर्वी झालेले संशोधन, शासकीय अहवाल, शासकीय आकडे, लिखित व अलिखित स्वरुपात प्रकाशित माहितीच्या आधारे द्वितीयक सामग्री संकलित करुन त्याचे विश्लेषण करण्यात येईल व निष्कर्ष काढण्यात येतील.

**महिन्यानिहाय कामाची योजना:**

| अ.क्र. | महिने | काम |
|---|---|---|
| १. | ०१-०३ | पूर्व संशोधन अभ्यास , प्रश्नावली तयार करणे |
| 2. | ०४-०६ | प्रत्यक्ष माहिती संकलन : प्राथमिक व दुय्यम स्रोत |
| ३. | ०७-०९ | संकलित केलेल्या माहितीचे विश्लेषण करणे |
| ४. | १०-१२ | विश्लेषित माहितीची मांडणी करणे, संशोधन अहवाल पूर्तता |

**आर्थिक मदत रुपये १००००/- (दहा हजार रुपये फक्त)**

| अ.क्र. | साठी अनुदान | रक्कम |
|---|---|---|
| १. | पुस्तके आणि जर्नल्स | ५००० |
| २. | आवश्यक असल्यास उपरणे | - |
| ३. | रसायने आणि काचेच्या वस्तू | - |
| ४ | आकस्मिता ( विशेष गरजांसह ) | ५००० |
| **एकूण** | | **१००००** |

संशोधक

**(तुषार रमेश महाले)**